**प्रेस नोट** **दि.१५/०७/२०२६**

## गुन्हे शाखेची कारवाई : दूध भेसळ प्रकरणी दोघांना अटक

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष ११, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि, कांदिवली (प.),मुंबई |
| गु र न व कलम | गु.प्र.शा. गु.अ.वि. गु.र.क्र. ८२/२०२६ कलम २७४, ३४५(३), ३४७(१), ३१८(४), ३३६(३), ३(५) बी.एन.एस. सह कलम २६, २७, ३१, शिक्षा कलम ५९ व ६३ अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियम व नियमन २०११ ( गोरेगाव पोलीस ठाणे गु.नों.क्र. ७७६/२०२६) |
| गुन्हा घडला तारीख वेळ | दिनांक १५/०७/२०२६ रोजी ०५.१५ वाजता |
| गु.दाखल दिनांक व वेळ | दिनांक १५/०७/२०२६ रोजी १५.२३ वाजता |
| घटनास्थळ | अंकुर बिल्डींगजवळ,सिध्दीविनायक सेवा मंडळ सोसायटी, प्रेम नगर, तिन डोंगरी, लिंक रोड जवळ, गोरेगाव (प), मुंबई |
| अटक आरोपीची संख्या | ०२ |
| जप्त मुददेमाल व अंदाजे किमंत | १) अमुल व गोकुळ या नांमाकित कंपन्याचे ३९,५०४/- रू.किंमतीचे एकुण ५५८ लिटर दुध<br>२) अमुल ताजा,अमुल गोल्ड २२४ बनावट रिकाम्या पिशव्या<br>३) भेसळ करणे करीता आवश्यक असलेली साधन सामुग्री<br>४) मोबाईल फोन अ.कि.१०,०००/- **एकुण मालमत्ता ५०३०४/-** |

गोरेगाव पोलीस ठाणे हददीतील अंकुर बिल्डींगजवळ,सिध्दीविनायक सेवा मंडळ सोसायटी, प्रेम नगर, तीन डोंगरी, लिंक रोड जवळ, गोरेगाव (प), मुंबई याठिकाणी दोन इसम नामांकित दुध कंपन्याच्या दुधाच्या पिशवीत अस्वच्छ पाणी मिसळुन ते भेसळ युक्त दुध नागरिकांना वितरीत करत असलेबाबत कक्ष ११ गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि, कांदिवली (प.), मुंबई यांना गोपनीय माहिती मिळाली होती. सदर भेसळयुक्त दुध हे लहान मुले व नागरिकांच्या आरोग्यास हानीकारक असल्याने सदर बाबत शहानिशा करण्यात आली.

त्याप्रमाणे दिनांक १५/०७/२०२६ रोजी पहाटे मिळालेल्या विश्वसनीय माहितीची शहानिशा करून कक्ष ११ च्या पथकाने अन्न व औषध प्रशासन,बृहन्मुंबई महाराष्ट्र शासन येथील अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह अंकुर बिल्डींगजवळ,सिध्दीविनायक सेवा मंडळ सोसायटी, प्रेम नगर, तिन डोंगरी, लिंक रोड जवळ, गोरेगाव (प), मुंबई येथील रूम नंबर १२ व ३०६ याठिकाणी छापा टाकुन नमुद ठिकाणी नामांकित अमुल गोल्ड,अमुल ताजा व गोकुळ कंपन्याच्या मुळ पिशव्या कात्रीने कापुन त्या पिशव्यामधील दुध काही प्रमाणात बाहेर काढुन त्यामध्ये मानवी सेवनास हानिकारक असे अस्वच्छ पाणी मिसळुन त्या दुधाच्या पिशव्या स्ओव्ह पिन व मेणबत्तीच्या सहाय्याने पुन्हा सिल करून ते नामांकित कंपन्याचे प्रमाणित दुध आहे असे भासवुन

सामान्य नागरिकांची फसवणुक करून विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या दोन इसमांना भेसळयुक्त दुध व दुध भेसळीकरीता वापरण्यात आलेल्या साहित्यासह ताब्यात घेतले.

सदर इसमाकंडे अंदाजे ३९,५०४/- रूपये किंमतीचे एकुण ५५८ लिटर भेसळयुक्त दुध मिळुन आले ते नष्ट करण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्या नमुद इसमाविरूध्द वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास कक्ष ११ चे सपोनि बनसोडे हे करीत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री देवेन भारती,मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री अनिल कुंभारे,मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री कृष्णकांत उपाध्याय,मा.पोलीस उपआयुक्त (प्रकटीकरण -१) श्री नवनाथ ढवळे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त(डी - उत्तर) श्री रविंद्र अडाणे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत जगदाळे,पोनि बाबासाहेब काकडे,पोनि विश्वास पाटील,सपोनि सरला थोरात, सपोनि दादासाहेब बनसोडे,पोउपनि बाळासाहेब शिंदे,सफौ ३४३८३/सुर्वे,पो.हं.क्र ०३१३७ / गोवळकर,पो. ह.क्र.०३३६०/खताते,पो.ह.क्र.००८५०/खांडेकर,पो.ह.क्र.०७१६४१/सानप,पो.शि.क्र. ११० ८२८/ वरठा तसेच अन्न सुरक्षा अधिकारी श्री जयकुमार प्रदीप पाटील व पथक यांनी पार पाडलेली आहे.